




दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA



प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका,गाव पातळीवर वार्ताहार/पत्रकार/जाहिरातदार प्रतिनिधी नेमणे आहे.

दैनिक वादळ वार्ता

या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

** पात्रता **

१. समाजसेवेची आवड २. जनसंपर्क ३. स्मार्ट फोन असणे आवश्यक ४. सोशल मीडियाचा वापर करता येणे

संपर्क-९४२२६६००७७

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.



vadalvartanews@gmail.com


●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७



● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार १२ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २०९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# वंचितच्या राज्यस्तरीय धोरणाची मती यशस्वी लिटमस टेस्ट ठरली; पुन्हा तो परिणाम दिसणार

## २०१९ मध्ये वंचितने स्वतंत्रपणे लढत आपले उपद्रवमूल्य सिद्ध केले आहे.



गेल्या दहा वर्षांच्या महाराष्ट्राच्या राजकारणात ॲड. प्रकाश आंबेडकर हे वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून वंचितांच्या पर्यायी राजकारणाची मांडणी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. दलित, आदिवासी, ओबीसी, वंचित मराठे अशा वंचित घटकांचे 'सत्ता संपादन' मेळावे घेत त्यांनी ही पर्यायी मांडणी सुरू केली आहे. सांगलीच्या मैदानात आता ही मांडणी किती परिणामकारक ठरेल? २०१९ मध्ये 'वंचित'ने राज्यभरात स्वतंत्रपणे लढत देत आपले उपद्रवमूल्य सिद्ध केले आहे. भाजपने (BJP) एकूणच महाराष्ट्राच्या राजकारणात ज्या काही उलथापालथी घडवल्या आहेत, त्यात आपली म्हणून स्वतंत्र 'स्पेस' शोधण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. ॲड. आंबेडकर यांच्या भारिप-बहुजन महासंघ किंवा वेगवेगळ्या रिपब्लिकन गटांना सांगली जिल्ह्याच्या राजकारणात दखल घेण्याइतका फारसा वाव कधीच मिळाला नाही. आता 'वंचित' महाआघाडीत असेल किंवा नसेल, हे ठरण्याआधीच सांगलीच्या राजकारणाची चर्चा थोडी घाईची असली तरी गरजेची आहे. आता गतवेळी पडळकरांना निष्ठावान 'रिपब्लिकन' मतांबरोबरच धनगर आणि मुस्लिमांची भक्कम साथ मिळणार, हे ॲड. आंबेडकर यांच्या त्या वेळच्या सभेतून स्पष्ट झाले. 'वंचित'च्या राज्यस्तरीय धोरणाची ती यशस्वी 'लिटमस टेस्ट' ठरली. आता या वेळी 'वंचित' महाआघाडीचा भाग असेल तर नक्कीच फायद्याचे ठरेल. याचा अर्थ 'वंचित'मागील सर्व मते महाआघाडीला ट्रान्सफर करू शकेल आणि नसेल, तर आता पूर्वीइतका परफॉर्म पुन्हा करू शकेल, असेही नाही. मराठा आरक्षण आंदोलन आणि 'वंचित'ची भूमिका याचा जिल्ह्याच्या राजकारणावर काही परिणाम झाला आहे का? 'वंचित'ने या आंदोलनात स्पष्ट अशी भूमिका घेतलेली नाही, मात्र ओबीसी व्होट बँक निर्मितीचा प्रयत्नही त्यांनी यानिमित्ताने राज्यभर केला आहे. सांगलीत आंबेडकर यांनी किंवा ओबीसींचा जिल्ह्यात कोणताही मोठा मेळावा किंवा वातावरणनिर्मिती जिल्ह्यात झालेली नाही. राज्यस्तरावर ओबींसीच्या पक्षस्थापनेची घोषणा करणारे प्रकाश शेंडगे यांनी आजवर जिल्ह्यात आजवर संघटन दाखवणारा कोणताही मोठा मेळावा घेतलेला नाही. त्यामुळे ओबीसी मतांच्या ध्रुवीकरणाचे उघड प्रयत्न किंवा वारे आतापर्यंत तरी जिल्ह्यात दिसलेले नाही.

थोडक्यात, ते महाआघाडी समवेत असतील तर फायद्याचे आणि नसतील तर तोट्याचे ठरेल, असे नक्की म्हणता येईल. कारण गेल्यावेळी 'वंचित' आणि असदुद्दीन ओवेसींच्या 'एमआयएम'चे जोरदार वारे वाहत होते. त्या वाऱ्याला पडळकरांच्या धनगर व्होट बँकेची जोड मिळाली होती. आता संदर्भ बदलले आहेत. ओवेसी आणि पडळकरही 'वंचित'समवेत नाहीत. गेल्यावेळी काँग्रेसचा उमेदवारच रिंगणात नव्हता. आता महाआघाडीचा उमेदवार ठरेल, तेव्हा बरेचसे चित्र स्पष्ट होईल.

# जिल्हास्तरीय उर्दू लेखन स्पर्धेत पाटोद्याची शेख इकरो जिल्ह्यात प्रथम

**वादळवार्ता/पाटोदा**

सर्वात गोड व जुनी भाषा म्हणून उर्दु भाषेकडे पाहिले जाते सुफी-संत असो किंवा शायर असो उर्दु भाषे शिवाय त्यांचे उच्चार होऊच शकत नाही. अशी उर्दू भाषेचं महत्त्व पाहून उर्दु शिक्षक क्लब व्दारे जिल्हास्तरीय उर्दू लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत बीड जिल्ह्यातुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उर्दु अरब गल्ली या शाळेतील ४ थी ची विद्यार्थ्यीनी शेख इकरा मशरोद्दीन हिने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला याबद्दल तिला रोख एक हजार रुपये पारितोषिक सन्मानचिन्ह मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले दि.११ मार्च सोमवार रोजी पाटोदा मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने १०१ रुपये रोख




बक्षीस पाटोदा जिल्हा परिषद प्राथमिक उर्दु शाळेत शेख इकरा मशरोद्दीन या चुमुकलीचा व तिच्या पालकांचा सत्कार करुन बक्षिस वितरण करण्यात आले यावेळी उर्दु शिक्षक शेख इम्रान शेख इस्माईल,शिक्षिका रेश्मा परविन बखतियारोद्दीन , मौलाना शेख युनुस,पत्रकार हमीदखान पठाण, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सय्यद खदीर फिटर,इकराचे पिता मशरूद्दीन शेख व आई उपस्थित होते.

# क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पेठ बीड सार्वजनिक जंयती उत्सव

## समितच्या अध्यक्षपदी योगेश गायकवाड तर सचिवपदी राजकिरण जाधव

**वादळवार्ता/बीड**

बीड शहरातील पेठ भागात दरवर्षी प्रमाणे याही वर्षी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले पेठ बीड सार्वजनिक जंयती मोठ्या उत्सवात साजरी करण्यात येते व सांकृतिक कार्यक्रम घेण्यात येतात या पेठ बीड सार्वजनिक जंयती चे मार्गदर्शक RPI (A) युवक प्रदेशध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली हा उत्सव पार पडतो पेठ बीड सार्वजनिक जंयती चे संस्थापक अध्यक्ष अक्षय भाई कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली ही कार्यकारणी जाहिर करण्यात आली यावेळी अध्यक्षपदी योगेश गायकवाड सचिव पदी राजकिरण जाधव उपाध्यक्ष राहुल कोकाटे याची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे व यावर्षी मोठ्या उत्सवात जंयती साजरी होणार आहे आसे संस्थापक अध्यक्ष अक्षय भाई कोकाटे यांनी सांगितले यावेळी पेठ बीड मधील सर्व जेष्ठ मंडळी सर्व युवा नेते युवक या बैढकीला प्रामुख्याने उपस्थित होते.

# कात्रज घाटात वणवा लागल्याची घटना रविवारी रात्री घडली.

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे/पंकज भंडारी**



रविवारी रात्री पुण्यातील कात्रज घाटात वनवा लागल्याची घटना घडली.तसेच अग्निशमन दलाने पाण्याचा मारा करून रात्री उशिरा अथक प्रयत्नांती आग आटोक्यात आणली कात्रज घाटातील डोंगरावर रविवारी रात्री झाडांचा पाचोळ्याला आग लागली. मोठ्या प्रमाणावर धूर झाल्याचे वाहन चालकाने पाहिले. त्यानंतर वणवा भडकल्याची माहिती वागनचालकांकडून कात्रज येथील अग्निशमन दलाला कळविण्यात आली. अग्निशमन दलाचे दोन बंब तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नांती पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. आग अन्यत्र पसरू न देण्याची काळजी जवानांनी घेतली. त्यामुळे घाटातील इतर भाग आगीच्या ज्वाळांपासून सुरक्षित राहिला. आग पूर्ण आटोक्यात आल्यानंतर जवान तेथून रवाना झाले.

## लोकसभा निवडणूक

### लोकसभा निवडणुकीत कुणाला तिकीट, कुणाचा पत्ता कट होणार?



चर्चा अशी आहे की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं 2 सर्व्हे केले आहेत. ज्यात ४ ते ५ लोकसभा जागांबद्दलचे रिपोर्ट नकारात्मक निघालेत. भाजपच्या सर्व्हेतही तीच गोष्ट समोर आल्याची चर्चा आहे. असं म्हणतायत की सध्या शिंदेंचे खासदार असलेल्या नाशिक, वाशिम-यवतमाळ, कोल्हापूर, हातकणंगले, परभणी इथली स्थिती अनुकूल नाहीय. म्हणून यापैकी ३ जागांवरचे उमेदवार बदलावेत, किंवा जागांची अदलाबदल व्हावी, अशा सूचना शिंदेंना भाजपकडून देण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. नाशकातून शांतिगिरी महाराज इच्छूक आहेत. आधी राज ठाकरेंच्या निवासस्थानी शांतिगिरी महाराज गेले होते. मात्र राज ठाकरेंची भेट झाली

### कमी जागा मान्य नसल्या मुळे शिंदेंची दिल्लीवारी रद्द?



महायुतीच्या जागावाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. जागावाटपासाठी गेल्या काही दिवसांपासून सातत्याने बैठका पार पडत आहेत. पण या बैठकांमध्ये अजूनही ठोस निर्णय घेण्यात आलेले नाहीत. आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार, भाजप आगामी लोकसभा निवडणुकीत जवळपास 35 पेक्षा जास्त जागांवर उमेदवार उभे करण्याच्या तयारीत आहे. तर राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला 3 ते 4 आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला केवळ 8 ते 10 जागा मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. महायुतीच्या जागावाटपाचा हा फॉर्म्युला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मान्य नसल्याची चर्चा आहे.

### भाजप महाराष्ट्रात कुणा कुणाला उमेदवारी देणार?



लोकसभा निवडणुकीबाबत दिल्लीतून एक मोठी बातमी समोर आली आहे. दिल्लीतील बैठकीत महाराष्ट्रातील उमेदवारांची चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या बैठकीत राज्यातील काही उमेदवारांच्या नावाची चर्चा झाली आहे. कोल्हापूरसाठी समरजित घाटगे यांच्या नावाची चर्चा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने जागा सोडली नाही तर समरजित घाटगे हे धनुष्यबाणाच्या चिन्हावर लढणार, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. सांगलीतून खासदार संजयकाका पाटील यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. पुण्यातून मुरलीधर मोहोळ यांच्या नावाची चर्चा आहे. बीडमधून खासदार प्रितम मुंडे यांच्या ऐवजी पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे.

# बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेंद्र औटे याची नांदेड विभागात बदली

**वादळवार्ता/पाटोदा**

[1]बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा पाटोदा तालुक्याची रहिवासी असलेले व सध्या मुंबई विभागात कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेंद्र औटे यांची नांदेड विभागात बदली झाली आहे मुंबईसारख्या ठिकाणी आपल्या जबाबदारीचे निष्ठेने पालन करणारे बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र शैलेंद्र औटे यांची नुकतीच नांदेड विभागात भोकर पोलीस ठाण्यात येथे बदली झाली आहे सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेंद्र औटे हे कर्तव्यदक्ष व कार्यतत्पर पोलीस अधिकारी म्हणून मुंबईत परिचित आहेत. शिस्तप्रिय म्हणून त्यांचे नावलौकिक असून मुंबई पोलीस विभागात उत्कृष्ट कामगिरी केली आहे. सामाजिक कार्यातही नेहमी त्यांचा पुढाकार असतो. त्यांनी मुंबई येथील अनेक आदिवासी तरुणांना घडवले असून त्याच्या मार्गदर्शनाने अनेक तरुण पोलीस सेवेत अधिकारी पदावर कार्यरत आहेत. जय भवानी सहकारी साखर कारखाना येथे कार्यरत असलेले सुरक्षा अधिकारी तथा माजी कॅप्टन नारायण औटे यांचे ते ज्येष्ठ सुपुत्र आहेत मराठवाड्यात त्यांची बदली झाल्याने नातेवाईक त्यांच आष्टी



पाटोद्याचा मित्रपरिवार व जय भवानी सहकारी साखर कारखान्यातील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेंद्र औटे यांचे स्वागत व अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

1

# संपादकीय

## प्रेम म्हणजे काय?

आजच्या काळात जास्तकरून प्रेम शब्दाला स्त्री व पुरुष यांच्या प्रेम प्रसंग- प्रणय यांच्याशी जोडून पाहिले जाते. परंतु प्रेम हे जगातील कोणत्याही वस्तुशी अथवा व्यक्तीशी होऊ शकते. प्रेमाच्या प्रभावानेच सृष्टीतील लोक एक दुसऱ्याची मदत करतात, एक दुसऱ्याच्या जीवनात सहयोग करता. याशिवायही प्रेमाचे अनेक रूप आहेत. जसे पतीपत्नीचे प्रेम, भाऊ बहिणीचे प्रेम, मित्रांचे आपापसातील प्रेम, प्रियकर आणि प्रेयसीचे प्रेम, गुरु आणि शिष्यचे प्रेम इत्यादी इत्यादी. प्रेमाशिवाय मनुष्य जीवन संभव नाही. म्हणूनच प्रेम हेच जीवन आहे, असे म्हटले जाते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे खरे प्रेम हे नेहमी निस्वार्थ असते, स्वार्थी तर लोक असतात जे त्याला विकृत स्वरूप देतात. अशी उद्बोधक माहिती श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजींच्या सदर लेखात जरूर वाचा... संपादक.

पूज्य साने गुरुजींनी तर मानवधर्मच प्रेमावर अवलंबून असल्याचे सांगितले आहे. प्रेम काय आहे? खऱ्या प्रेमाचे वर्णन करणे खुप कठीण आहे. खरे प्रेम त्या सागरासारखे आहे ज्याची खोली न मोजता येण्यासारखी आहे. खरे प्रेम ती भावना आहे जी एखादी वस्तू, व्यक्ती, स्थान, जीव अथवा ईश्वराविषयी तयार होते. प्रेमाचा सरळ संबंध भावनेशी आहे. प्रेमाचा हा सिद्धांत प्राणी आणि धार्मिक विश्वासांवरही लागू होतो. उदाहरण म्हणून एखादी व्यक्ती तिच्या कुत्र्याशी खुप प्रेम करते, स्वातंत्र्य सैनिकाला स्वातंत्र्याशी प्रेम आहे किंवा एखाद्या व्यक्तीला परमेश्वराशी प्रेम आहे. अशा पद्धतीने प्रेमाची विविध रूपे असतात. प्रेमाला विशिष्ट मर्यादेत बांधता येत नाही. प्रेम स्वछंद उडणाऱ्या पक्ष्याप्रमाणे स्वतंत्र असते. खरे पांडित्य अडिच अक्षराच्या प्रेमाभ्यासाने येते, असे संतशिरोमणी कबीरजी महाराज म्हणतात-

प्रेमाचा खरा अर्थ निस्वार्थ भावनेने समोरच्याला सर्वस्व अर्पण करणे हाच आहे. आपल्या प्रेमीच्या हित आणि आनंदासाठी स्वतःच्या आनंदाचा त्याग करणे, खरे प्रेम आहे. प्रेम जीवन देते जीवन घेत नाही. प्रेम परमेश्वराने दिलेली समतुल्य, पवित्र आणि महान वस्तू आहे. मनुष्य या पवित्र प्रेमाला त्याच्या स्तरावरून खाली ओढत आहे. मनुष्याने प्रेमाला इच्छा आणि वासना पर्यंत मर्यादित केले आहे. म्हणून आज हे स्वार्थीप्रेम हे हत्या आणि आत्महत्यांचे सर्वात मोठे कारण बनले आहे. प्रेम देणारा समर्पण भावनेने वागतो, मात्र प्रेम घेणारा आपले नाते- संबंध काय? हे विचारात न घेताच त्याचा गैरफायदा उठवतो. गुरू-शिष्य हे नाते मातृप्रेमाचे असते, मात्र संधीसाधू, भोंदूगुरू हा शिष्याच्या जवळिकतेच्याच सुवर्ण संधीप्रमाणे वाट बघत असतो. संधी हाती येताच तो हलकट-लंपट दुष्कृत्य, अत्याचार, अनाचार, भ्रष्टाचार वा बलात्कार करून पवित्र नाते कलंकित करतो. गुरूबंधू- गुरूसिख यांचे परस्परातील नाते हे बहिणभावाचे असावयास हवे, मात्र तेही असेच वासनांध भावनेतून स्वतःच्या उजळ रुपाला काळिमा फासून घेतात. अशा आपल्या दुर्व्यवहारी- व्याभिचारी वृत्तीने समाजाचे "शी-थूऽऽऽ..!" तोंडावर पाडून घेतात आणि आजिवन तुरुंगात सडतात. यामुळेच भक्तीमार्ग संशयाच्या भोवऱ्यात अडकला आहे. अशांना ज्ञानी- गुणी कोण म्हणेल? ईश्वर हे प्रेमाचेच नाव आहे, मग या विधानाची सत्यता गोत्यात तर येणारच ना!

अर्थ: नाना प्रकारच्या कल्पनांनी भ्रमित, मोहाच्या जाळ्यांत पूर्णपणे गुरफटलेले आणि विषयभोगांत लंपट झालेले हे आसुरी स्वभावाचे लोक अखेरीस अमंगळ नरकांत रूततात.

जर तुम्ही कोणाशी खरे प्रेम करीत असाल, परंतु या गोष्टीपासून चिंतीत असाल की तुमचा प्रेमी देखील तुम्हाला असेच निस्वार्थ प्रेम करतो की नाही. तर चला आता आपण जाणून घेऊया की खरा प्रेमी अथवा प्रेमिकाचे गुण कोणते आहेत- सन्मान करणे: मान सन्मान कोणत्याही व्यक्तीचे आभूषण असते. जर तुमचा प्रेमी तुमचा खुप सन्मान करीत असेल व तुमच्या सोबतच इतरांशी देखील सन्मानाने वागत असेल तर तो व्यक्ती निश्चल मनाचा आहे. आजकाल अनेक प्रेमी- प्रेमिका आहेत, काही वरवर तर काही एक दुसऱ्यावर निस्सीम प्रेम करतात. परंतु लहान मोठ्या गोष्टीवर शिव्या देणे आणि चारित्र्यावर संशय घेणे असा त्यांचा व्यवहार असतो. जर एखादी व्यक्ती असे करीत असेल तर ती कपटी मनाची व स्वार्थी व्यक्ती आहे. स्वतःपेक्षा जास्त तुमच्यावर विश्वास ठेवणे: खरे प्रेमी स्वतःपेक्षा जास्त एकमेकांवर विश्वास ठेवतात. विश्वास ठेवल्याने एकमेकांमधील नाते आणखी मजबूत होते. जर तुमचा प्रेमी- प्रेमिका तुमच्यावर विश्वास ठेवत नसेल आणि तुमच्या लहान मोठ्या गोष्टीवर संशय करीत असेल, तर अशा व्यक्तीपासून दूर राहिलेलेच चांगले. काळजी घेणे: खरे प्रेमी- प्रेमिका एकमेकांची नेहमी काळजी घेतात. त्यांना स्वतःपेक्षा जास्त आपल्या प्रेमीची चिंता असते. जर प्रेमी- प्रेमिका वाईट परिस्थितीतून जात असेल, तर अशावेळी एक खरा प्रेमी नेहमी विश्वास आणि काळजी घेतो. एका आईप्रमाणे निस्वार्थ भावनेने आपल्या प्रेमीची काळजी करतो. नेहमी खरे बोलणे

# आपल्या देशातील विविध भाषांचा परिचय सर्वांना व्हावा!

(साहित्य अकादमी स्थापना दिवस.)

साहित्य अकादमी ही एक भारतीय भाषांचे संवर्धन करणारी भारतीय संस्था आहे. या संस्थेची स्थापना दि.१२ मार्च १९५४ रोजी झाली. या संस्थेला सरकारी अनुदान असले तरी स्वरूप स्वायत्त आहे. साहित्य अकादमी ही साहित्याच्या क्षेत्रात वेगवेगळे उपक्रम राबवत असते. या अंतर्गत संशोधन, तसेच लेखकांसाठी प्रवास अशा उपक्रमांसाठी अर्थपुरवठा करते. तसेच साहित्य अकादमी पुस्तके व समकालीन भारतीय साहित्य हे हिंदी भाषा भाषेतील नियतकालिक ही प्रकाशित करते. भारतीय साहित्याचा विश्वकोशही साहित्य अकादमी ने प्रकाशित केला आहे. साहित्य अकदामीचे बहुभाषिक व अतिशय समृद्ध असे भारतातील एक प्रमुख ग्रंथालय आहे. भारतीय भाषा साहित्य अकॅडमीने २४ भाषांना मान्यता दिली आहे.

ही भारतीय साहित्यविषयक विविध उपक्रम व कार्ये अमलात आणणारी, भारतातील राष्ट्रीय पातळीवरची प्रमुख साहित्यसंस्था आहे. दि.१२ मार्च १९५४ रोजी नवी दिल्ली येथे ही साहित्यसंस्था स्थापन झाली. ही केंद्र शासनाच्या अखत्यारीखालील स्वायत्त स्वरूपाची संस्था असून तिला भारत सरकारच्या सांस्कृतिक खात्यातर्फे पूर्णतः आर्थिक अनुदान दिले जाते. १९५६ मध्ये साहित्यसंस्था म्हणून तिची अधिकृत नोंदणी झाली. भूतपूर्व पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु हे या संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. या अकादेमीचे प्रमुख कार्य भारतातील साहित्यविषयक पूर्वसंचिताचे जतन करून, नवीन स्वतंत्र तसेच अनुवादित वाङ्मयाच्या निर्मितीला प्रोत्साहन देणे, हे आहे. अकादेमी विविध प्रादेशिक भाषांतील लेखकांना उत्तेजनार्थ पारितोषिके व मानचिन्हे देऊन गौरवीत असते. प्रकाशने, अनुवाद, परिसंवाद, कार्यशाळा, देशाच्या विविध भागांत साहित्यमेळाव्यांचे आयोजन, लेखकांच्या वाचकांशी भेटी घडवून आणणे, असे नानाविध प्रकारचे उपक्रम राबवून त्यांद्वारे भारतीय साहित्याच्या अभिवृद्धीस व विकासास चालना देणे, हे या संस्थेचे उद्दिष्टानुसारी प्रमुख कार्यक्षेत्र आहे. अकादेमीच्या वतीने प्रकाशनांचा विस्तृत व विविधस्वरूपी कार्यक्रम राबविला जातो. भारतीय भाषांतील समकालीन वाङ्मयाची सूची तयार करणे, समकालीन लेखकांच्या उत्कृष्ट व निवडक साहित्यकृतींचे संग्रह प्रकाशित करणे, आधुनिक भारतीय भाषांतील वाङ्मयाचा इतिहास व विकास यांचा विस्तृत आढावा घेणारे प्रमाणभूत ग्रंथ इंग्रजी व हिंदी भाषांत तयार करून घेऊन ते प्रकाशित करणे, प्राचीन संस्कृत महाकाव्ये व पुराणे यांच्या सटीप आवृत्त्या प्रसिद्ध करणे इ.अनेक योजना व उपक्रम अकादेमीने आजपावेतो राबविले आहेत. भारतीय भाषांचे इतिहास प्रकाशित करून भारतातील प्रमुख भाषांच्या विकासाला उत्तेजन देणे व त्यांना जास्तीत जास्त परस्परांच्या सान्निध्यात आणणे, हे उद्दिष्ट अकादेमीने साध्य केले आहे. आपल्या देशातील विविध भाषांचा परिचय सर्वांना असणे शक्य नाही; परंतु भारतातील प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीने आपल्या भाषेतील ज्ञानाबरोबरच इतर भाषांतील साहित्याची माहिती करून घेण्याची इच्छा ठेवली पाहिजे. इतर भाषांत लिहिलेल्या ग्रंथांचा, तसेच प्रसिद्ध पुस्तकांचा परिचय करून घेतला पाहिजे व या प्रकारे आपल्या व्यक्तिमत्त्वात भारतीय संस्कृतीचा विशाल व उदार दृष्टिकोण आणि बहुभाषिक प्रेरणा वृद्धिंगत केली पाहिजे, पं.नेहरुंच्या या उद्‌गारांमध्ये साहित्य अकादेमीच्या कार्याची उद्दिष्टे नेमकेपणाने प्रतिबिंबित झाली आहेत. या प्रक्रियेला मदत म्हणून साहित्य अकादेमीने भारतातील प्रादेशिक भाषांमधील प्रसिद्ध पुस्तकांचे इतर प्रादेशिक भाषांमध्ये अनुवाद करण्याची व विविध भारतीय भाषांचे इतिहास प्रसिद्ध करण्याची योजना कार्यान्वित केली आहे. अकादेमीच्या या प्रयत्नांमुळे आपल्या मातृभाषेतून अन्य विविध भारतीय भाषांतील साहित्याचा आस्वाद घेणाऱ्या वाचकांच्या साहित्यिक-सांस्कृतिक ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्याचे, त्या अधिक सखोल करण्याचे आणि भारतीय विचार व साहित्य यांच्यामागील एकात्म पार्श्वभूमीचे त्यांचे भान जागृत करण्याचे अकादेमीचे उद्दिष्ट बव्हंशी साध्य झाले आहे.

आपल्या विविधस्वरूपी उपक्रमांची कार्यप्रणाली व पद्धती निश्चित करण्यासाठी अकादेमीने लिखित संविधान तयार केले असून त्यातील मार्गदर्शक तत्त्वांनुसार अकादेमीचे कार्य चालते. अकादेमीने एकूण चोवीस प्रादेशिक भारतीय भाषांना अधिकृत मान्यता दिलेली आहे. त्या प्रत्येक प्रादेशिक भाषेतील एकूण दहा सदस्यांचे सल्लागार मंडळ अकादेमीमार्फत स्थापले जाते व त्या त्या प्रादेशिक भाषेतील अकादेमीकृत कार्याचे आयोजन व सुसूत्रीकरण या सल्लागार मंडळामार्फत केले जाते. संबंधित भाषेतील वेगवेगळे उपक्रम, पुरस्कार, अनुवादयोजना राबविण्यासाठी ग्रंथनिवड इ.अनेक बाबतींत हे सल्लागार मंडळ अकादेमीला सल्ला देत असते व त्यानुसार अकादेमी कार्यवाही करते. पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण या चार प्रादेशिक विभागांसाठी वेगवेगळी चार प्रादेशिक विभागीय कार्यालये अकादेमीने स्थापन केली आहेत व त्या त्या प्रादेशिक विभागांतील भाषांमध्ये परस्पर आदान-प्रदान घडवून आणणे, हे या विभागीय कार्यालयांचे प्रमुख उद्दिष्ट आहे. नवी दिल्ली येथे अकादेमीचे मुख्य मध्यवर्ती कार्यालय असून कोलकाता, मुंबई, बंगलोर व चेन्नई येथे प्रादेशिक विभागीय कार्यालये आहेत. अकादेमीचे चार भाषांतर-विभाग असून ते बंगलोर, दिल्ली, अहमदाबाद व कोलकाता येथे आहेत. बडोदे येथे अकादेमीचे प्रकल्प कार्यालय असून तेथे मौखिक तसेच आदिवासी साहित्याचे जतन व विकासाचे कार्य चालते. भारतीय भाषांतील साहित्याचे अभिलेखागारही तेथे आहे. नवी दिल्ली येथील मुख्य कार्यालयात तसेच बंगलोर व कोलकाता येथील विभागीय कार्यालयांत बहुभाषिक ग्रंथांचा विपुल, प्रचंड व मौलिक साठा असलेली वैशिष्ट्यपूर्ण व समृद्ध ग्रंथालये आहेत. चोवीस प्रादेशिक भाषांतील सुमारे दीड लाख ग्रंथ हे या संग्रहालयाचे लक्षणीय वैशिष्ट्य होय.

साहित्य अकादेमी प्रतिवर्षी मान्यताप्राप्त चोवीस प्रादेशिक भाषांतील सर्वोत्कृष्ट सर्जनशील साहित्यकृतींसाठी चोवीस पुरस्कार व अनुवादित ग्रंथांसाठी चोवीस पुरस्कार देत असते. इंग्रजी भाषिक ग्रंथांसाठीही पुरस्कार ठेवले आहेत. स्वतंत्र साहित्यकृतीसाठी रु.एक लाख आणि मानचिन्ह व अनुवादित कृतीसाठी रु.पंचवीस हजार आणि मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. शिवाय साहित्यातील मौलिक योगदानाबद्दल साहित्यिकांना विशेष गौरववृत्ती दिली जाते. या संदर्भात मराठी साहित्यातील विशेष उल्लेखनीय दोन घटना म्हणजे, साहित्य अकादेमीने सर्वोत्कृष्ट भारतीय ग्रंथांना पुरस्कार देण्याची योजना १९५५पासून सुरू केली. त्या योजनेतील पहिला मराठी पुरस्कार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वैदिक संस्कृतीचा विकास या ग्रंथाला लाभला, तसेच साहित्य अकादेमीने २००४मधील सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त जाहीर केलेल्या पहिल्या विशेष जीवनगौरव पुरस्काराचे मानकरी श्रेष्ठ दलित कवी नामदेव ढसाळ हे ठरले. साहित्य अकादेमीमार्फत भाषा सम्मान हा पुरस्कार प्रादेशिक भाषांच्या विकासकार्यार्थ दिला जातो. दक्षिण आशियाई भाषांतील विद्वानांना आनंद कुमारस्वामी पुरस्कार देण्यात येतो. भारतीय साहित्याच्या संदर्भात विशेष मौलिक कार्य करणाऱ्या परकीय विद्वानांना सन्मान्य गौरववृत्ती दिली जाते. साहित्य अकादेमी एकूण चोवीस प्रादेशिक भाषांत व इंग्रजी भाषेतही पुस्तके प्रकाशित करते. या योजनेंतर्गत भारतीय भाषांतील पारितोषिकप्राप्त पुस्तकांचे अनुवाद, भारतीय साहित्यातील सर्व प्रादेशिक भाषांतील श्रेष्ठ आणि युगप्रवर्तक साहित्यिकांवर, त्यांचे जीवन व वाङ्मयीन कार्यांचा परिचय करून देणाऱ्या व्याप्तिलेखवजा प्रबंधिका, भारतीय प्रादेशिक भाषांचे वाङ्मयेतिहास, भारतीय तसेच विश्वसाहित्यातील श्रेष्ठ, अभिजात साहित्यकृतींची प्रादेशिक भाषांत भाषांतरे, निवडक ललित साहित्यकृतींची उदा. कथा, कविता, निबंध इ. संकलने, चरित्रे, भारतीय साहित्यिकांचे अल्पपरिचयात्मक कोश, अनुवाद-सूची, भारतीय साहित्यकोश इ.विविध प्रकारची पुस्तके अकादेमीने प्रकाशित केली आहेत. या वेगवेगळ्या प्रकारांत अकादेमीने सुमारे ४ हजार पुस्तके प्रकाशित केली आहेत. विशेष संदर्भमूल्य असलेल्या, अकादेमीमार्फत प्रकाशित काही महत्त्वाच्या ग्रंथांचा उदाहरणादाखल निर्देश करता येईल- एन्सायक्लोपीडिया ऑफ इंडियन लिटरेचर पाच खंड- १९८७-९२ हा भारतीय साहित्यकोश; नॅशनल बिब्लिऑग्रफी ऑफ इंडियन लिटरेचर- चार खंड: १९०१-५३ ही राष्ट्रीय ग्रंथसूची; निरनिराळ्या प्रादेशिक भाषांतील विद्यमान लेखकांचा अल्पपरिचय करून देणारा हूज हू ऑफ इंडियन रायटर्स- दोन खंड: १९९९; डॉ.सुकुमार सेनकृत हिस्टरी ऑफ बेंगॉली लिटरेचर- १९६० यांसारखे भारतातील प्रादेशिक भाषांतील साहित्याचे इंग्रजी, हिंदी भाषांतील इतिहास; मेन ऑफ लेटर्स तसेच मेकर्स ऑफ इंडियन लिटरेचर अशा ग्रंथमालांतर्गत भारतीय साहित्याच्या इतिहासातील महत्त्वाच्या टप्प्यांवरील युगप्रवर्तक अशा प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन साहित्यिकांचे जीवन व वाङ्मय यांचा परिचय करून देणारी इंग्रजी पुस्तकांची मालिका, याशिवाय साहित्य अकादेमीतर्फे इंडियन लिटरेचर- इंग्रजी भाषेतील द्वैमासिक, समकालीन भारतीय साहित्य- हिंदी भाषेतील द्वैमासिक व संस्कृत प्रतिभा- संस्कृत भाषेतील अर्धवार्षिक ही तीन नियतकालिके प्रकाशित केली जातात. वाङ्मयेतिहास, सौंदर्यशास्त्र तसेच विविध वाङ्मयीन विषयांवर अकादेमीमार्फत प्रतिवर्षी सुमारे तीस चर्चासत्रे प्रादेशिक, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरांवरही आयोजित केली जातात. त्याचप्रमाणे अनेक प्रकारच्या कार्यक्रम मालिकाही योजिल्या जातात. उदा.मीट द ऑथर, कविसंधी, कथासंधी, अस्मिता, मुलाकात, मेन अँड बुक्स, थ्रू माय विंडो, लोक, द मेनी व्हॉइसेस, आविष्कार, अंतराल, लिटररी फोरम अशा विविध वाङ्मयीन कार्यक्रमांचे हिंदी, इंग्रजी भाषांत आयोजन केले जाते. याशिवाय अकादेमी नियमितपणे अनुवाद-कार्यशाळाही भरवते.

अकादेमी दर वर्षी साधारण फेब्रुवारी महिन्यात साहित्य-महोत्सव सप्ताह आयोजित करते. या आठवडाभरात काही विशिष्ट विषयांवर प्रकल्प योजिले जातात. उदा.प्राचीन भारतीय साहित्य, मध्ययुगीन भारतीय साहित्य, आधुनिक भारतीय साहित्य यांसारखे विषय या प्रकल्पांत चर्चिले जातात. याबरोबरच अकादेमीने गेल्या सुमारे पाच सहस्रकांच्या कालावधीतील उत्कृष्ट निवडक भारतीय साहित्यकृतींचे संकलन एकूण दहा खंडांत प्रकाशित केले आहे. भारताच्या वेगवेगळ्या भागांतील आदिवासींच्या साहित्याचे भाषांतर व प्रकाशन हा अकादेमीने हाती घेतलेला आणखी एक महत्त्वपूर्ण प्रकल्प होय. बडोदे येथील अकादेमीच्या कार्यालयात तो कार्यान्वित करण्यात आला आहे. ह्या प्रकल्पांतर्गत पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अकादेमीने नॅशनल बुक ट्रस्टच्या सहकार्याने एक संयुक्त प्रकल्प राबविला असून त्याअंतर्गत शंभर भारतीय अभिजात साहित्यकृतींच्या भाषांतराची महत्त्वाकांक्षी योजना हाती घेण्यात आली आहे. भारतीय साहित्याच्या अभिलेखागाराची योजना हा अकादेमीचा आणखी एक महत्त्वपूर्ण प्रकल्प होय. या प्रकल्पांतर्गत चित्रफिती, दृक्‌ध्वनिफिती, श्रवणफिती, सीडी आदी तांत्रिक साधनांद्वारे भारतातील दुर्मीळ व मौलिक साहित्यधनाचे जतन व दस्तऐवजीकरण तसेच श्रेष्ठ भारतीय साहित्यिकांची मूळ हस्तलिखिते, छायाचित्रे इ. सामग्री जतन करणे, अशा काही योजना राबविल्या जात आहेत. अकादेमीच्या वतीने निरनिराळ्या राज्यांतील गुणी, तरुण लेखकांना प्रवासशिष्यवृत्ती दिली जाते. त्यांनी भारतातील अन्य राज्यांमध्ये जाऊन तेथील लेखकांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधावा, तसेच तेथील प्रादेशिक साहित्य-संस्कृतीचा परिचय करून घ्यावा, या उद्देशाने अशा शिष्यवृत्त्या दिल्या जातात. अकादेमीच्या सांस्कृतिक देवाण-घेवाण योजनेच्या अंतर्गत भिन्न भिन्न प्रदेशांतील- भाषांतील लेखकांनी परस्परांचे साहित्य अनुवादित व प्रकाशित करणे, तसेच दोन भिन्न भाषिक राज्यांमध्ये लेखक-विद्वानांची परस्पर आवक-जावक असे अनेकविध उपक्रम राबविले जातात. भारतातील सर्व राज्यांमधील प्रादेशिक भाषांमध्ये परस्परजवळीक साधावी, वाङ्मयीन आदान-प्रदान व्हावे, त्यायोगे साहित्यिक-सांस्कृतिक एकात्मतेची जाण वृद्धिंगत व्हावी आणि देशाच्या सांस्कृतिक व भावनात्मक ऐक्यास हातभार लावावा, ही अकादेमीची भूमिका या सर्व प्रकल्प-उपक्रमांमागे कार्यरत आहे.

साहित्य अकादमी पुरस्कार हा साहित्य क्षेत्रातील एक सर्वोच्च सन्मान असून साहित्य अकादमी, नवी दिल्ली या संस्थेतर्फे दर वर्षी २४ भारतीय भाषांतील सर्वोत्तम साहित्यांसाठी दिला जातो. या पुरस्काराचे स्वरूप हे पुरस्काराचे मानचिन्ह, (जे स्वतः श्रेष्ठ दिग्दर्शक सत्यजित रे यांनी डिझाईन केले आहे.) आणि १ लाख रोख रक्कम असे आहे. साहित्य अकादमीची स्थापना ही १९५४ साली भारताच्या सांस्कृतिक खात्याने केली असून त्याचा उद्देश हा भारतात अभिजात साहित्याचा प्रचार करणे हा आहे. त्याचाच एक भाग म्हणून हा साहित्य अकादमी पुरस्कार दरवर्षी दिला जातो. या पुरस्काराच्या नामांकनाची प्रक्रिया ही वर्षभर सुरू असते. यामध्ये सर्वात आधी प्रत्येक भाषेतील तज्ञ व्यक्तींची समिती नेमली जाते, ज्यातून त्या त्या भाषेतील ५ उत्कृष्ट पुस्तकांची निवड केली जाते. जी पुढे प्राथमिक समितीपुढे मांडली जाते. या समितीतून ज्या ज्या पुस्तकांच्या नावाची शिफारस होईल त्या पुस्तकांचा ३ पंचांकडून परत विचार केला जातो आणि शेवटचा निर्णय होऊन हा पुरस्कार जाहीर होतो. या पुरस्काराचे निकष म्हणजे साहित्य हे अभिजातच हवे, ज्यातून त्या भाषेचा आणि संस्कृतीचा प्रचार होईल. तसेच एकदा साहित्य अकादमी मिळालेल्या लेखकाचा परत विचार केला जात नाही. अपूर्ण साहित्य, संशोधनपर ग्रंथ, दुसऱ्या साहित्याचा आधार घेऊन लिहिलेली पुस्तके, अनुवादित पुस्तके, एकापेक्षा जास्त लेखकांनी लिहिलेली पुस्तके, तसेच साहित्य अकादमी मंडळात काम करणार्या लेखकांची पुस्तके अशा साहित्यांना या पुरस्कारात स्थान नसते. तसेच लेखक किंवा प्रकाशक स्वतः स्वतःच्या पुस्तकाची शिफारस करू शकत नाही. तसेच एखाद्या मृत्यू पावलेल्या लेखकाच्या मृत्यूच्या पाच वर्षांपर्यंतच त्याच्या साहित्याची शिफारस करता येते. या सर्व निकषांवरच ही पुस्तके निवडली जातात. सन १९५५पासून हा पुरस्कार देण्यात येत आहे.

!! राष्ट्रीय साहित्य अकादमी स्थापना दिनाच्या सप्ताहभर समस्त साहित्यिक बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष-**
**7775041086.**

# महाशिवरात्र स्वच्छतेतून बांधली शिवपुजा

## देशमुख परिवारने घेतला पुढाकार !

**वादळवार्ता/शिरूरकासार**

धाकट्या अलंकापुरीत महाशिवरात्र महावर्णीला भाविकांनी बिल्वदळ , कवठ, फुल, फळ, अर्पण करत दिवसभर व रात्री देखील अनेकांनी सिध्देश्वराची पुजा करून दर्शन घेतले मात्र देशमुख परिवाराने पुढाकार घेऊन दिवसभर व अर्धरात्रीपर्यंत पुजेच्या निर्माल्याबरोबर कागद ,बाटल्या , चप्पल बुट अशा पध्दतीचा कचरा हातात खराटा घेऊन मंदिर व परिसर स्वच्छतेतून सिध्देश्वराची पुजा बांधून स्वच्छतेचा व्यापक संदेश देण्याचे काम केले . महाशिवरात्र निमित्ताने संस्थानवर महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे



मार्गदर्शनाखाली ४६ व्या सप्ताहाचे आयोजन केले होते ,सात दिवस हजारो भाविक उपस्थित राहून आपली सेवा भजन किर्तन प्रवचन अन्नदान माध्यमातून रूजू करत होते ,शिवाला कवठ ,बेलपत्र , नैवैद्य आदी समर्पित करतांना मात्र होणारा कचरा दुर्लक्षीत होत होता , महाशिवरात्रीच्या पर्वणीवर तर भाविकांची झुंबड उडाली होती व त्यातून मंदिर परिसरात कचरा देखील होत होता ,प्रतेक जन दर्शन प्रसाद घेऊन जात होता मात्र विष्णू देशमुख व त्यांचा परिवार सायंकाळी दर्शनासाठी आले असता हे निर्माल्य व कचरा त्यांचे लक्ष वेधून गेला व लागलीच त्यांनी आपल्या परिवारासह स्वत: हातात खराटे घेऊन मंदिर ,घाट व समाधी मंदिर परिहर स्वच्छ करण्याचे काम हाती घेतले हे पाहून सोबत असलेल्या शालन कुलकर्णी ,कोमल कुलकर्णी, पवारबाई , लक्ष्मण थोरात , अणिल गाडेकर व त्याच्या पत्नीनेही हाती झाडू घेतले व रात्री दोनच्या सुमारास मंदिर व परिसर स्वच्छ करून आपली सेवा सिध्देश्वर चरणी समर्पित केली . मंदिरात दर्शन घेणे हे जसे पुण्य समजले जाते त्याहून अधिक मंदिर व परिसर स्वच्छ केल्यास अधिक फलदायी असते ही संत शिकवण ध्यानी धरून आम्ही शिवरात्र पर्वणीवर स्वच्छतेतून शिवाची पुजा बांधली असे विष्णू देशमुख यांनी सांगितले. हा देखावा वाटू नये म्हणून सारे कसे सामसुम झाल्यावर आम्ही हे काम निष्काम भावनेतून केले असेही सांगितले .

# कुणब्यासाठी कल्याणकारी योजना राबवणारा रयतेचा राजा छत्रपती संभाजीराजे-प्रा. बापूसाहेब शिंदे




**वादळवार्ता/बीड**

आपल्या राज्यातील अठरा-पगड जाती- धर्मातील लोकांना सोबत घेऊन लोककल्याणकारी राज्यकारभार छत्रपती संभाजी महाराज यांनी केला. आपल्या राज्यातील रयतेला जे लागेल ते राज्यकारभारामधून दिले, वेळप्रसंगी कसण्यासाठी जमीन, बैलजोडी, अन्नधान्य पुरवठा केला. शेतकरी कुणब्यासाठी अशा विविध लोककल्याणकारी योजना छत्रपती संभाजी महाराज यांनी राबवल्या असे प्रतिपादन प्रा. बापूसाहेब शिंदे यांनी केले. येथील संभाजी राजे लायब्ररी अँड मॅनेजमेंट सायन्स महाविद्यालय बीड या महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला समाजसेवक स्वप्निल गलधर, संस्था सचिव प्रा. गणेश पोकळे, प्र. प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना प्रा. शिंदे म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज यांच्या राज्यातील कायदे पाहिले तर स्वराज्यातील प्रत्येकाला जगण्याचा अधिकार आहे. तो कोणी हिरावून घेऊ शकत नाही. त्यांना गुलाम बनवता येणार नाही. असे पत्र लिहून सर्वांना कळवले होते. आपल्या सैन्यातील बलिदान दिलेल्या सैनिकांच्या मुलांचे पालन पोषण करण्याची सोय त्यांनी केली. शेतकऱ्यांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवून समाज हित जोपासले. प्रचंड प्रतिभावंत, भारतातील विविध भाषा बरोबरच परकीय भाषेचे देखील ज्ञान त्यांना अवगत होते. त्यांचे विचार हे लोककल्याणाचे होते. छत्रपती संभाजी महाराज यांचे विचार आजच्या पिढीने आत्मसात केले. तर सर्व समाज सुजलाम -सुफलाम होईल असेही प्रा. बापूसाहेब शिंदे म्हणाले . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भूषण मठपती यांनी केले. तर शेवटी आभार प्रा. सुहास गाढवे यांनी मानले .कार्यक्रमाला प्रा. राजश्री महाजन प्रा.शिवशंकर पटवारी प्रा. ओंकार देशमुख,महेश नेवडे,प्रवीण उंदरे,दीपक जाधव,सचिन चौरे, संध्या खोसे,व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आई वडिलांची सेवा करा तुम्हाला जीवनात कशाचीही कमी पडणार नाही - हभप कृष्णा म.राऊत

**वादळवार्ता/गेवराई**

आजचा काळ खूप वाईट आहे. अनेक मुलं आपल्या आईवडिलांना सांभाळत नाहीत, बोलत नाहीत हे दुर्दैव आहे. ज्यांनी तुम्हाला हे जग दाखवलं त्या आईवडिलांना तुमच्याकडून काहीच अपेक्षा नाहीत. त्यांना फक्त तुमच्या दोन चांगल्या शब्दाची गरज आहे. जगातील सर्वात श्रेष्ठ दैवत हे आपले आईवडीलच आहेत म्हणून त्यांची सेवा करा तुम्हाला जीवनात कशाचीच कमी पडणार नाही असे प्रतिपादन युवा कीर्तनकार हभप कृष्णा म. राऊत यांनी केले. तालुक्यातील बेलगुडवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहाच्या सहाव्या दिवशीच्या कीर्तन सेवेप्रसंगी ते बोलत होते. सत्वर पाव ग मला, भवानी आई रोडगा वाहीन तुला सासरा माझा गावी गेला,तिकडेच खपवी त्याला भवानी आई, रोडगा वाहीन तुला सासू माझी जाच करिते,लवकर न्येई ग तिला, भवानी आई रोडगा वाहीन तुला जाऊ माझी फडाफडा बोलते, बोडकी कर ग तिला भवानी आई, रोडगा वाहीन तुला नणंदेचं कार्टं किरकिर करतं,खरूज येऊ दे त्याला भवानी आई, रोडगा वाहीन तुला दादला मारून आहुति देईन मोकळी कर ग मला, भवानी आई, रोडगा वाहीन तुला एका जनार्दनी सगळेच जाऊ दे एकटीच राहू दे मला, भवानी आई, रोडगा वाहीन तुला... या संत जनार्दन महाराज यांच्या भारुड अभंगावर त्यांनी छान विवंचन केले. यावेळीपुढेबोलतानात्यांनीसांगितलेकी, आई वडील हे देवाची रुप आहेत. त्यांची सेवा करा सर्व तिर्थ त्यांच्या सेवेत आहेत. त्यांची सेवा केली तर समाजात तुम्हाला ताट मानेन जीवन जगता येईल. जगात कितीही मोठे झालात तरी आई वडील आणि देवाला विसरायचं नाही. आज खूप वाईट परिस्थिती आहे. आईवडिलांना कोणी बोलायला तयार नाहीत, म्हणून आज प्रत्येक घरात रामायणाची गरज आहे. आई वडील समजण्यासाठी रामायण समजून घ्या त्यातून रामाच्या विचाराचे आचरण करा त्यामुळे तुमच्या घराचे गोकुळ झाल्याशिवाय राहणार नाही म्हणून आजच्या काळात ही सामाजिक भावना समजून घेण्यासाठी कीर्तन, भजन ही काळाची गरज आसल्याचा मौलिक सल्लाही त्यांनी हे सहावे कीर्तन पुष्प गुंफताना दिला. यावेळी त्यांना संगीत विशारद रामनाथ म.सालपे, विकास म.मुटके, हभप कैलास म.आनंदे, ज्ञानेश्वर म.पवार यांनी गायनाची साथ दिली. तर नामदेव म.बेदरे, माऊली म.पवार व सोनाजी म.पवार यांनी मृदंगाची उत्तम साथ दिली.

# बँकेच्या संचालक मंडळाने आपल्या संस्थेकडे मालकापेक्षा केवळ राखणदार म्हणून पाहिले:- श्रीमती राजश्री पाटील

## अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या १८ व्या शाखेचा शुभारंभ

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

बँकेच्या संचालक मंडळाने आपल्या संस्थेकडे मालकापेक्षा केवळ राखणदार म्हणून पाहिले. तसेच बँकेच्या ग्राहकांनी घेतलेले कर्ज हे नियमितपणे भरून बँकेस सहकार्य करावे असे आवाहन नांदेड येथील गोदावरी अर्बन मल्टिस्टेटच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती राजश्री हेमंत पाटील यांनी केले. त्या अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या चौसाळकर कॉलनी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथील १८व्या शाखेच्या शुभारंभ प्रसंगी बँकेच्या उद्घाटिका म्हणून बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, नांदेड जिल्हा शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष बाबुराव कदम कोहळीकर , बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी, प्रा. वसंत चव्हाण तसेच बँकेचे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते. अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या शुभारंभ सोहळ्याची सुरुवात दीप प्रज्वलन करून त्याचबरोबर माता योगेश्वरी देवी तसेच धर्मवीर संभाजी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केले. या शुभारंभ प्रसंगी कार्यक्रमाच्या उद्घाटिका श्रीमती राजश्रीताई हेमंत पाटील म्हणाल्या की, बचत गटाच्या माध्यमातून सुरू केलेली गोदावरी अर्बन मल्टिस्टेट ही केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर इतरही पाच राज्यात २००० कोटींच्या ठेवीच्या माध्यमातून ग्राहकांना सेवा देत असल्याचे सांगितले . कोणत्याही आर्थिक संस्थेच्या संचालक मंडळाने आपल्या संस्थेकडे मालकापेक्षा केवळ राखणदार म्हणून पाहिले तर त्या संस्थेची आर्थिक भरभराट तथा उन्नती होण्यापासून कोणीच रोखू शकत नसल्याची भावना याप्रसंगी श्रीमती राजश्रीताई पाटील यांनी व्यक्त केली. ग्राहकांनी देखील ज्यादा व्याज दराच्या मोहजाळात न अडकता आपली जमापुंजी कुठे सुरक्षित राहील याबद्दल विचार करावा अन्यथा त्यांच्यावर पश्चाताप करण्याची वेळ आल्याशिवाय राहणार नाही असेही आवाहन केले. त्याचबरोबर संस्थेच्या कर्मचारी बांधवानी देखील ती संस्था आपली आहे या भावनेने काम करावे जेणेकरून त्या संस्थेत येणारा ग्राहक तथा ठेवीदार हा पूर्णपणे संतुष्ट होईल. उपस्थित महिलांना देखील बँकेबाबत व व्यवहाराबाबत मार्गदर्शन केले. बँकेच्या वतीने कर्जपुरवठा करतांना




देखील काळजीपूर्वक करण्याचे आवाहन केले. त्याचबरोबर कर्जदाराने देखील आपण घेतलेले कर्ज हे बुडवण्यासाठीच आहे किंवा ते माफ होणार आहे अशी भावना मोडीत काढावी असाही मार्मिक सल्ला यावेळी पाटील यांनी दिला. अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक ही १८शाखांच्या माध्यमातून कार्यरत आहे हे राजकिशोर मोदी व त्यांचे सर्व सहकारी अतिशय उत्तम प्रकारे काम करत आहेत याचीच प्रचिती असल्याचे श्रीमती राजश्रीताई पाटील यांनी सांगितले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप नांदेड जिल्हा शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष बाबुराव कदम कोहळीकर यांनी केला. त्यांनी राज्यातील एकूण सहकार क्षेत्रावर भाष्य केले. अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या १८व्या शाखेच्या शुभारंभ प्रसंगी अध्यक्ष राजकिशोर मोदी व त्यांच्या संपूर्ण संचालक मंडळाचे अभिनंदन केले. तसेच राजकिशोर मोदी यांचे कार्य सामाजिक , आर्थिक, राजकिय तसेच सांस्कृतिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर असल्याचे सांगितले. त्याचबरोबर बँकेची पहिली ग्राहक कु.राजलक्ष्मी डोंगरे हिचा पाहुण्यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास उपस्थित असलेले दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की, त्रिदल पतसंस्थेचे ज्ञानदेव शेप,वीज कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष अर्जुन थोरात यांचा सन्मान यावेळी करण्यात आला. बँकेच्या या शुभारंभ सोहळ्याचे सूत्रसंचालन विजय रापतवार यांनी केले तर उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार कापूस पणन महासंघाचे सदस्य ऍड. विष्णुपंत सोळंके यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास बँकेचे ग्राहक, ठेवीदार,सभासद तसेच राजकिशोर मोदी यांच्यावर प्रेम करणारे अनेकजण व महिला देखील मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# पुण्यातील लष्करात नोकरीला लावण्याच्या आमिषाने फसवणूक

**वादळवार्ता/पुणे**

पुणे लष्करात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून फसवणूक करुन नेपाळला पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या भामट्याला कोंढवा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. गणेश बाबुलाल परदेशी (रा. कृष्ण केवला सोसायटी, एनआयबीएम रोड, कोंढवा) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. गणेश परदेशी याने लष्करात नोकरीच्या आमिषाने आठ लाख ३२ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल होती. याप्रकरणी कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर परदेशी पसार झाला होता. पोलीस त्याच्या मागावर होते मात्र त्याने राहण्याचे ठिकाण बदलल्याने आणि ओळख लपवण्यासाठी चेहरा कपड्याने झाकत असल्याने तो पोलिसांना सापडत नव्हता. परदेशी नेपाळला पळून जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक लेखाजी शिंदे, विकास मरगळे आणि शशांक खाडे यांना मिळाली. कोंढवा भागातील एका दुकानात चेहरा झाकून खरेदीसाठी आलेल्या परदेशीला पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतले. ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे, पोलीस निरीक्षक गुन्हे मानसिंग पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक लेखाजी शिंदे, दिनेश पाटील, पोलीस उपनिरीक्षक वैभव सोनवणे, अमोल हिरवे,राहुल वंजारी, अभिजीत रन्तपारखी, शशांक खाडे यांच्या पथकाने केली.

# कृषि विभाग (आत्मा)यांच्या वतीने केज तालुक्यात शेतकरी गटाचे प्रशिक्षण संपन्न

**वादळवार्ता/केज**

कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) बीड,परंपरागत कृषि विकास योजना अंतर्गत शेतकरी गटाचे प्रशिक्षण मौजे-कळंब अंबा व चंदन सावरगाव येथे नुकतेच घेण्यात आले. प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुका कृषि अधिकारी सागर पठाडे यांच्या नियोजनातून शेतकरी प्रशिक्षण हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मास्टर ट्रेनर संदीप खडके,तंत्र सहाय्यक ऋषिकेश लोखंडे,आश्विननाना टोम्पे,कांताबापू इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना खडके म्हणाले की,आजच्या काळात शेतीचा




खर्च वाढला आहे.उत्पादन घटत आहे.सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून खर्च कमी करता येईल.विषमुक्त उत्पादन तयार करणे चांगल्या आरोग्यासाठी आवश्यक आहे. शेतीतील निविष्ठा योग्य प्रकारे वापरून उत्पादन वाढवता येईल असे मत व्यक्त केले. आत्माचे आनंद मुंडे यांनी सेंद्रिय निविष्ठा तयार करणे,सेंद्रिय पिकाचे विक्री व्यवस्थापन करताना येणाऱ्या संभाव्य अडचणी,उत्पादन कमी न होता सेंद्रिय शेती राबविण्यात येणाऱ्या बाबी याविषयी मार्गदर्शन केले. प्रशिक्षण यशस्वीतेसाठी कृषि आत्माचे आनंद मुंडे यांनी परिश्रम घेतले. प्रशिक्षणास कळंबअंबा,चंदन सावरगाव गटातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
# वादळ वार्ता

## सर्वसामान्यांसाठी आनंदाची बातमी !
## आता ‘आनंदाचा शिधा’ सोबत महिलांना मिळणार साडी !

वादळवार्ता/मुंबई तुम्हाला माहिती असेल, सरकारकडून आनंदाचा शिधा वाटप केला जातो- यापूर्वी यामध्ये साखर, तेल, रवा, चनाडाळ, मैदा, कच्चे पोहे या सहा पदार्थांचा समावेश आहे. दरम्यान आता अंत्योदय रेशनकार्ड धारक कुटुंबांना यंदा साडी देखील मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाने यंदाच्या शिवजयंतीपासून ‘आनंदाचा शिधा’ देताना किराणा सामनासोबत आता महिलांना साडी देखील देण्याचा निर्णय बजेटमध्ये जाहीर केला होता. या निर्णयाची अंमलबजावणी आजपासून सुरु झाली आहे. अंत्योदय शिधापत्रक धारकांना दरवर्षी एक साडी भेट देण्यात येणार. यामुळे गरीबांना सणावाराला गोडधोड करण्यासोबत घरातील महिलांना नवीन साडी परिधान करुन सण साजरा करता येणार आहे.

# खरच सुधीर मुनगंटीवारांची मनापासून लोकसभा निवडणूक लढवण्याची इच्छा

**वादळवार्ता/पाटोदा**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी जागा वाटपाचा तिढा अजून सुटलेला नाहीय. महायुतीमध्ये जागा वाटपाचा पेच कायम आहे. घटक पक्ष काही जागांवर अडून बसले आहेत. त्यामुळे जागा वाटपाचा फॉर्म्युला अजून निश्चित होत नाहीय. भाजप किमान 30-32 जागा लढविण्यावर ठाम असून शिवसेनेला 12-13 आणि राष्ट्रवादी काँग्रेसला 4-5 जागा देण्याचा प्रस्ताव आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसला इतक्या कमी जागा मान्य नाहीत. महायुतीमध्ये घटक पक्षांचा सन्मान ठेवला जाईल, असं देवेंद्र फडणवीस यांनी आधीच म्हटलं आहे. सोमवारी सायंकाळी नवी दिल्लीला महायुतीची बैठक होणार होती. एकनाथ शिंदे, अजित पवार दिल्लीला जाणार होते. पण ही बैठक रद्द झाली. भाजपाच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक पार पडली, त्यासाठी देवेंद्र फडणवीस दिल्लीला गेले होते. राज्यसभेतील खासदार आणि राज्यातील मंत्र्यांना, आगामी लोकसभा निवडणुकीत उतरवण्याची भाजपाची रणनिती आहे. याचाच भाग म्हणून सुधीर मुनगंटीवार यांना लोकसभेच तिकीट मिळणार असल्याची चर्चा आहे. त्यांना चंद्रपूरमधून लोकसभेची उमेदवारी मिळू शकते. काल ते सुद्धा भाजपाच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीसाठी दिल्लीला गेले होते. राज्यात परतल्यानंतर टीव्ही 9 मराठीने त्यांच्याशी संवाद साधला. लोकसभा निवडणूक लढवण्याबद्दल त्यांचे विचार जाणून घेतले. मला तिकीट कोणत्याही परिस्थितीत मिळू नये, यासाठी मी पूर्ण प्रयत्न करतो आहे. मात्र शेवटी यश-अपयश हे ईश्वराच्या हाती आहे. लोकसभेत जाण्याची



माझी इच्छा नाही. पण पक्षाचा आदेश सर्वतोपरी असतो” असं सुधीर मुनगंटीवार म्हणाले. “मला पक्षाने या राज्याची सेवा करण्याची संधी प्राप्त करून दिली. अयोध्येत श्रीरामाच्या मंदिरासाठी कास्ट पाठवण्याची संधी मला मिळाली. पाकिस्तान सीमेवर शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याची संधी मला मिळाली. वाघ नख घेऊन येण्याचा एमओयु करण्याची संधी मला मिळाली. चंद्रपूर सारख्या जिल्ह्यामध्ये मला ज्याप्रमाणे विकास करण्याची संधी मिळाली. चंद्रपूरचा विकास करताना वेगवेगळी काम करता आली” असं सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

“माझी अजून तयारी झाली नाही. मी पक्षाकडे अजून हीच विनंती करतो आहे, मला इथेच राहू द्या असं मी म्हणतो आहे. पण पक्षाने आदेश दिला तर कार्यकर्ता म्हणून ते माझं कर्तव्य आहे” असं सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

# या पुढे भाजपा ला मतदान केले तर महाराष्ट्र सह भारत देश कंगाल होईल - प्रा.ईश्वर मुंडे

**वादळवार्ता/माजलगाव**

माजलगाव दि.११(प्रतिनिधी) आता देशात लोकसभा निवडणूकीचे बिगूल केंव्हा ही वाजू शकते.प्रत्येक पक्ष त्या दृष्टीने कामाला लागलेले आहेत.इंडीया आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार पक्ष आपला उमेदवार देणार आहे.

येणा-या लोकसभा निवडणूकीत मतदारांनी भाजपला मतदान करू नये नाही तर महाराष्ट्रासह भारत देश आर्थिक दृष्ट्या कंगाल होईल असे मत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष बीड लोकसभेचे संभाव्य उमेदवार तथा राज्य प्रमुख, सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी सेल राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी माजलगाव येथील पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

पुढे बोलताना प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे म्हणाले की,मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारने जनतेला दिलेल्या आश्वासनांची पुर्तता केलेली नसलेल्यामुळे जनतेत तीव्र नाराजी आहे. मोदींची विकासाची गॅरंटी नसून भ्रष्टाचाऱ्यांना स्वच्छ करण्याची गॅरंटी आहे. महागाई,बेरोजगारी,शेतीमालाला भाव नाहीत,शेतकरी विरोधी



कायदे या मुळे असंतोष निर्माण झालेला आहे,शासकीय कंपन्यांचे खाजगीकरण,शासकीय नौकऱ्यांचे कंत्राटीकरण करून खाजगी कंपन्यांच्या हातात देश दिला जात आहे.

शेतकरी व शेती उद्योग वाऱ्यावर सोडून बड्या उद्योग पतींचे लाखो करोडोंचे कर्ज माफ केल्या जात आहे.त्या बदल्यात कंपन्यांकडून भाजप ला देणग्या व निवडणूक निधी मिळवला जात आहे या मुळे भारत देश दिवाखोरीत जाईल.

महाराष्ट्रातील उद्योगांचे गुजरातला अपहरण होत आहे या मुळे महाराष्ट्र कंगाल होईल.

बीड जिल्ह्यात केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाचा एक ही प्रकल्प उभा केलेला नाही.बीड जिल्ह्यातील ऊस तोड मजूरांना मजूरी वाढून देण्या पेक्षा त्यांच्या हातातील कोयता कायम स्वरूपी सुटला पाहीजे,त्यांच्या मुलांचे चांगले शिक्षण झाले पाहीजे.

या साठी बीड जिल्ह्यात नवीन उद्योग उभारणे,सिंचन प्रकल्प तलाव, शेती मालावर आधारीत प्रक्रिया उद्योग उभारणे,शेती आवजारे,सिंचन आवजारे तात्काळ अनुदानावर वाटप करणे आवश्यक आहे.

बीड परळी रेल्वे जलद गतीने पुर्ण होऊन घाटनांदूर ते अहमदनगर व सोलापूर ते जळगांव हे रेल्वे मार्ग तयार होऊन बीड जिल्ह्यात नवीन विमान तळ होणे आवश्यक आहे. आपणास पक्षाने व जिल्ह्यातील मतदारांनी संधी दिली तर आपण या गोष्टी प्राधान्याने पुर्ण करून घेऊ असे मत बीड लोकसभेचे संभाव्य उमेदवार प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी व्यक्त केले.

या वेळी जेष्ठ नेते दयानंद स्वामी,कचरू तात्या खळगे,मनोज फरके,शिवसेनेचे रामराजे सोळंके,राष्ट्रीय कॉंग्रेस चे नारायण होके,धारूर तालुकाध्यक्ष युवराज लगड,सिताराम क्षीरसागर,शेख बाबा ,प्रशांत बडे,महादेव देवकर यांचे सह पदाधिकारी व पत्रकार बांधव उपस्थीत होते.

# जागतिक महिला दिनानिमित्त कर्तुत्वान महिलांचा गुणगौरव सोहळा संपन्न...

**दैनिक वादळ वार्ता**
**गंगापूर/प्रा संजय तुपे**

दि. १० मार्च २०२४ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त राज्यस्थान कोटा येथील बंसल क्लासेस शाखा बजाजनगर तर्फे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवून उत्तुंग झेप घेणाऱ्या कर्तृत्वान महिलांचा सन्मान चिन्ह देवून गुणगौरव सोहळा *संपन्न झाल



प्रमुख उपस्थिती म्हणून दामिनी पत्करचा लता जाधव -मॅडम महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक एमआयडीसी वाळूज, हेडक्वानस्टेबल -कल्पना खरात मॅडम , पोलीस अंमलदार -आयोध्या दौंड मॅडम,घोडके मॅडम- त्रिमूर्ती स्कूल मुख्याध्यापिका, डिसूजा मॅम-सेंट जोसेफ स्कूल संस्थाचालिका, स्वाती मॅडम- सेंट जोसेफ स्कूल पर्यवेक्षिका व कॉर्डिनेटर, शिंदे मॅडम -तनवाणी स्कूल मुख्याध्यापिका, जाधव मॅडम- क्रांती पब्लिक स्कूल मुख्याध्यापिका ,खेडकर मॅडम - उद्योजक हॉटेल व्यवसायिका,बोबडे मॅडम- दिल्ली पब्लिक स्कूल एडमिन हेड ,ज्योतीताई गायकवाड- माननीय सभापती गंगापूर, ज्योतीताई चोरडिया-जिल्हा परिषद सदस्य,चेतना बोरोले- मॅडम लिटिल चॅम्प प्रायमरी

## पारधी समाजाच्या अमरन उपोषणाची गंभीर दखल प्रशासनाने घ्यावी

**दैनिक वादळ वार्ता**
**आबांजोगाई/परवेज पटेल**

अंबाजोगाई उपजिल्हाधिकारी कार्यालय समोर गेल्या अनेक दिवसापासून पारधी समाजाचे आमरण उपोषण कुटुंबासह पोलीस प्रशासनाच्या विरोधात उन्हाताना चालू आहे परंतु त्या पारधी समाजाच्या आमरण उपोषणास ना पोलीस प्रशासनाने दखल घेतली ना उपजिल्हाधिकारी यांनी दखल घेतली नाही तर या उपोषणाकडे सामाजिक क्षेत्रातील काम करणाऱ्या सेवाभावी संस्थेने ही दखल न घेतल्यामुळे आमरण उपोषणास बसलेल्या पारधी समाजाच्या कुटुंबाचे बेहाल होत आहेत तरी प्रशासनाने तात्काळ दखल घेत मेडिकल उपचार करावा अन्यथा मोठा अनर्थ होऊ शकतो त्या कुटुंबाची अंबाजोगाई वादळ वार्ता ने भेट घेतली असता आमच्याकडे कोणीच आलं नाही आम्हाला न्याय मिळणार किंवा नाही जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत आमचं उपोषण चालूच राहणार प्रशासनाच्या दारात मेलो तरी चालेल अशी भूमिका त्यांनी घेतली आहे




# जिल्ह्यातल्या आंबेडकरी चळवळीतील अग्रगण्य नाव म्हणजे बाबुराव पोटभरे !

**वादळवार्ता/ बीड**

बीड जिल्ह्यातल्या आंबेडकरी चळवळीतील अग्रगण्य नाव म्हणजे बाबुराव पोटभरे!गोरगरिबांच्या हक्कासाठी,त्यांच्या न्यायासाठी कुठल्याही जातीपातीचा विचार न करता त्यांच्या बाजूने उभा राहणारा नेता म्हणून पोटभरेंना आख्या महाराष्ट्रात ओळखले जाते. ज्याच्यावर अन्याय त्याच्या बाजूने उभे राहण्याचे चळवळीचे अंग असल्याने मराठा आरक्षणातील त्यांची सडेतोड भूमिकाही बीड जिल्ह्यात महत्त्वपूर्ण ठरली आहे. मराठा आरक्षणाचा’रियल सपोर्टर’ म्हणून त्यांच्याकडे पाहिल्या जाऊ लागले आहे.त्यामुळे मराठा युवकांत बाबुराव पोटभरे यांची ‘सुपर क्रेज’निर्माण झाली आहे. दरम्यान आरक्षण लढ्यातील आपला विश्वासू,खंबीर,सोबती सहकारी म्हणून गावखेड्यात त्यांची विश्वासाहर्ता आणि लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे. गरिबीचे चटके बसत असलेला मराठा समाज आपल्या हक्काच्या आरक्षणासाठी रस्त्यावर उतरला आहे.तो तळमळीने आपला आक्रोश सरकारकडे व्यक्त करत आहे.या लढ्याला बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी पुढे येऊन समर्थन दिले आहे. धरणे,उपोषणे,इत्यादी आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला. मनोज जरांगे पाटील या मराठा समाजाच्या प्रमाणिक नेतृत्वासाठी प्रसंगी जेलमध्ये जाण्याचीही त्यांनी तयारी दर्शवली. जाळपोळीच्या घटनेनंतर अनेक मराठा तरुणांवर खोटेनाटे गुन्हे दाखल करून पोलिसांनी दहशत माजवण्याचा प्रयत्न केला.अशावेळी निरापराध तरुणांना घरदार सोडून पळून जावे लागले. सरकारचा रोष आणि पोलिसांची



दडपशाही यामुळे कोणीही राजकीय पुढारी या दरम्यान पुढे येण्यास कचरताना दिसत होता.अशावेळी पोटभरेंनी निरपराध मराठा आंदोलकांना त्रास देऊ नका ही भूमिका घेऊन होणाऱ्या पोलीस अत्याचारा विरुद्ध कोंडी फोडली. त्यांची ही भूमिका मराठा तरुणांच्या भावनांना स्पर्श करणारी ठरली. मराठा हक्क आरक्षण परिषद येऊन मराठा समाजाला आरक्षणाची कशी गरज आहे,व त्यासाठी सर्व समाजांनी, सर्व राजकीय पुढाऱ्यांनी,पक्ष, संघटनांनी एकत्र येऊन त्यांना पाठिंबा द्यावा यासाठी मोठा प्रयत्न केला.व तो परिणामकारक ठरला. त्यामुळे गावखेड्यात परस्परा विरोधात संशयी तणावाचे वातावरण निवळले.त्यामुळे मराठा आरक्षणाच्या आंदोलनातील पोटभरे यांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली.ज्यामुळे जिल्ह्याभरातील मराठा तरुणात त्यांची’सुपर क्रेज’ निर्माण झाली आहे.त्यांची अन्यायप्रती आक्रमक शैली,आणि सडेतोड भूमिका वादादित अशीच आहे. त्यामुळे सर्वच जातीधर्माचे तरुण त्यांना मानू लागले आहेत. त्यांच्या संपर्कात आहेत.एकेकाळी येथील काही राजकीय पुढाऱ्यांनी आपल्या राजकीय स्वार्थासाठी त्यांची सामाजिक प्रतिमा मलीन केली होती.त्यांच्यावर जातीवादाचा शिक्का मारला होता.परंतु ही प्रतिमा किती खोटी आहे,याचा प्रत्यय त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक जाती-धर्माच्या युवकांना होत गेला. ज्याचा परिणाम बहुजन नेता म्हणून आज त्यांच्याकडे पाहिले जात आहे. मराठा आरक्षणात राहिलेली त्यांची आग्रही भूमिका तर मराठा तरुणात ‘सुपर क्रेज’झाली आहे.ओबीसी, दलित,मुस्लिम तरुणांच्या फेसबुक व्हाट्सअप डिपीवर रेगुलर दिसणारी त्यांची प्रतिमा आता मराठा तरुणांच्या व्हाट्सअप फेसबुक डीपीवरही दिसत आहे. परिणामी गावखेड्यात आपला ‘रियल सपोर्टर’खंबीर सोबती, विश्वासू सहकारी म्हणून त्यांची विश्वासाहर्ता आणि लोकप्रियता वाढताना दिसत आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )